आयडिया कार्ड १
मराठी

# पालक समूहासाठी

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

आई-बाबा हे मुलांचे पहिले शिक्षक असतात. प्रत्येक घरात हेच होत असते, पण जर आपण वस्तीमध्ये एकत्र आलो तर एक-दुसऱ्याची मदत करू शकतो. यासाठी आपल्याला आठवड्यातून कमीत-कमी एकदा तरी भेटावे लागेल. भेटी होतील, चर्चा होईल आणि विचारांची देवाणघेवाण होईल.

चला, व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.




येथून डाउनलोड करा

J3Q5P5

https://bit.ly/3pgJle2

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

पहा आणि समजून घ्या. दाखविलेले चित्र कागदावर काढा आणि मुलांसोबत पूर्ण करा.




वर्कशीट १ - बिंदू जोडणे.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड २
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात



- एकमेकांची खुशाली विचारून आजची मीटिंग सुरू करू या.
- मागील मीटिंगमध्ये जे ऐकले, पाहिले आणि जे काम करायचे ठरविले त्याबद्दल एकमेकांना सांगू या. आपण दिलेले काम पूर्ण केलेत का?
- 'दात घासा' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ. मुलांकडून हावभावासह म्हणवून घेऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

आपण जसे उत्तमरीत्या चालू, धावू शकतो. त्याप्रकारे मुलं चालू, धावू शकत नाहीत. आपण अशा काही कृती घेतल्यास मुलांना शरीराचा तोल सावरण्यास, चालण्यास, धावण्यास चालना मिळू शकते. चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.

चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.





येथून डाउनलोड करा

https://bit.ly/36zFMZT

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

दिलेली कृती पाहून, ऐकून व समजून घ्या.
मुलांसोबत कृती करा.




वर्कशीट २ - चित्रात रंग भरा.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड 3
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजची मीटिंग सुरू करू या.
- मागील मीटिंगमध्ये जे ऐकले, पाहिले आणि जे काम करायचे ठरविले त्याबद्दल एकमेकांना सांगू या. आपण दिलेले काम पूर्ण केले का?
- 'जेवायच्या आधी' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ. मुलांकडून हावभावासह म्हणवून घेऊ.



(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

मुलांचे छोटेसे जग आसपासचे ऐकून, पाहून, समजून, बोलून, अनुभव घेऊन हळूहळू मोठे होत असते. यात पालक म्हणून आपली भूमिका खूप महत्त्वाची ठरते. प्रत्येक नवीन गोष्टीची ओळख प्रत्यक्षरीत्या तसेच चित्रांद्वारे करून दिल्यास मुलांना समजणे सोपे जाते.

चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.




येथून डाउनलोड करा

https://bit.ly/3HefIEo

## मिळून काही करू

घरून काही वस्तू आणू या. सर्व वस्तू एका पिशवीत भरू.
पिशवीत न पाहता फक्त स्पर्शाने वस्तू ओळखण्याचा प्रयत्न करू या.
प्रत्येक पालकाला खेळायला सांगू या.



## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

दिलेली कृती पाहून, ऐकून व समजून घ्या.
मुलांसोबत कृती करा.



वर्कशीट ३ - चित्र ओळखणे.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड ४
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजची मीटिंग सुरू करू या.
- मागील मीटिंगमध्ये जे ऐकले, पाहिले आणि जे काम करायचे ठरविले त्याबद्दल एकमेकांना सांगू या. आपण दिलेले काम पूर्ण केले का?
- 'आपली पाच बोटे' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ. मुलांकडून हावभावासह म्हणवून घेऊ.



(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

प्रत्येक नवीन गोष्टीची ओळख प्रत्यक्षरीत्या तसेच चित्रांद्वारे करून दिल्यास मुलांना समजणे सोपे जाते, त्यांचा शब्दसंग्रह वाढतो हे आपण पाहिले आहे. याच्या पुढील पायरी म्हणजे समान वस्तूंच्या जोड्या लावणे, एकमेकांशी संबंधित असलेल्या वस्तूंच्या जोड्या लावणे ही होय. ही कृती आपण प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करून तसेच चित्रांद्वारे कशी करू शकतो हे या व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या.




येथून डाउनलोड करा

N9K0F2

https://bit.ly/3JYHjHv

## मिळून काही करू

जमिनीवर त्रिकोण आणि चौकोन काढू या. सर्व मिळून त्याच्या भोवती फिरू या. एका आकाराचे नाव घेऊन त्यात उडी मारू या.



## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

पहा आणि समजून घ्या. दाखविलेले चित्र कागदावर काढा आणि मुलांसोबत पूर्ण करा.




वर्कशीट ४ - छोटे कागदाचे तुकडे चिकटविणे.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड ५
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात




- एकमेकांची खुशाली विचारून आजची मीटिंग सुरू करू या.
- मागील आठवड्यातील 'गोळे क्रमाने लावा' ही कृती करताना आलेले अनुभव सांगू.
- 'मराठी मुळाक्षरे' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

गणिताचे आपल्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान आहे. शाळेत शिकताना, व्यवहारात गणित समोर येतच असते. याची पूर्व तयारी आपण मुलांकडून याच वयात करून घेतल्यास पुढील आयुष्यात गणित मुलांसाठी कठीण राहत नाही.

चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.



येथून डाउनलोड करा

F9U5G9

https://bit.ly/3shwE4D

## मिळून काही करू



जुने कागद घेऊन आपली आवडती वस्तू बनवू या. आपल्या लहानपणीच्या आठवणीत रमून जाऊ या. बनविलेल्या वस्तूंवर आपल्या मुलांचे नाव लिहून त्यांना भेट म्हणून देऊ या.
ज्या पालकांना वस्तू बनविताना अडचणी येत असतील, त्यांना मदत करू या.

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू यां

चित्रात दाखविल्यानुसार काही अक्षरकार्डे बनवून मुलांना द्या.
मुलांना घरातील वस्तू दाखवा. जसे-मोबाईल, चमचा, घड्याळ, खुर्ची इ.
मुलांना वस्तूच्या नावातील पहिले अक्षर उच्चारून त्यावर अक्षरकार्ड ठेवायचे आहे. जसे- म=मोबाईल






वर्कशीट ५ – बिंदू रेषेवरून गिरवा व पानांच्या जोड्या लावा.

आयडिया कार्ड ६
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात



- एकमेकांची खुशाली विचारून आजची मीटिंग सुरू करू या.
- मागच्या मीटिंगमध्ये जे पाहिले, ऐकले व जो अभ्यास केला, त्याबद्दल एकमेकांना सांगू. आपल्याला मुलांसोबत करायची कृती करताना काही अडचण आली का?
- 'ट्रॅफिक लाइट' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

आसपासच्या वस्तूंचा वापर वेगळ्या पद्धतीने केल्यास काहीतरी नवीन निर्माण केल्याचा आनंद होतो. तसेच या कृतींद्वारे मुलांच्या बोटांची पकड, डोळे व बोटांचा समन्वय चांगल्या प्रकारे होतो. या व्हिडिओत आपण रंग, कापूस, स्पंज, बोटे यांचा वापर करून सुंदर कलाकृती बनलेली पाहू शकतो.



स्कॅन करा / डाउनलोड करा

VSL7C4

https://bit.ly/3Hljtk

## मिळून काही करू



विविध रंगांच्या मदतीने आपल्या आवडीची रांगोळी काढून एकमेकींना दाखवू. ज्या पालकांना रांगोळी काढण्यात अडचणी येत असतील, त्यांना मदत करू. ज्या पालकांनी सुंदर रांगोळी काढली आहे, त्यांच्यासाठी टाळ्या वाजवू.

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

क प

कप

कागदाचे चौकोनी तुकडे करून त्यावर वेगवेगळी अक्षरे लिहून अक्षर कार्ड बनवा. डब्यात सगळी कार्डे एकत्र करा. दोन कार्डे उचलून त्यापासून कोणता शब्द तयार होतो हे मुलांना विचारा. वाचायला सांगा. हा खेळ खेळत रहा. मुलांना गरज पडल्यास मदत करा.

वर्कशीट ६ – चित्र मोजून अंक लिहा.

आयडिया कार्ड ७
मराठी

# पालक समूहासाठी

महाराष्ट्र शासन | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## स्वागत आणि सुरुवात



- एकमेकांची खुशाली विचारून आजची मीटिंग सुरू करू या.
- मागील आठवड्यातील 'अक्षर कार्डाच्या मदतीने नवीन शब्द बनविणे' ही कृती मुलांना सोपी वाटली का? मुलांनी कोणकोणते शब्द बनविले? त्यांना मदतीची गरज लागली का?
- 'एक-दो-तीन' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

मागील कार्डच्या ठसे-काम या कृतीप्रमाणे या कृतीमधूनही मुलांना नवीन निर्माण केल्याचा आनंद मिळतो व हात-बोटांची पकड, स्नायूंचा विकास, डोळे व बोटांचा समन्वय चांगल्या प्रकारे होतो. यासाठी घरातील चपातीच्या पिठात काही रंग मिसळून वापर करता येतो. चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.



शोधून डाउनलोड करा

P4F2G2

https://bit.ly/3HroVq6

## मिळून काही करू

चला, अक्षर कार्डामधून एक कार्ड उचलू या. त्या अक्षरापासून एका मिनिटात जेवढे शब्द लिहिता येतील तेवढे लिहू या. ज्या पालकांचे सर्वात जास्त शब्द लिहून होतील, त्यांच्यासाठी टाळ्या वाजवू या.

म → मका, माणूस, मासा

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

कपडे लटकविण्याचा हँगर घ्या. चित्रात दिल्यानुसार त्याच्या दोन्ही टोकांना दोऱ्याने दोन कप लटकवा. दोन्ही कपात एक-एक वस्तू ठेवा. दोन्ही वस्तूंपैकी कोणती जड व कोणती हलकी आहे हे मुलांना सांगायला सांगा. अशा वेगवेगळ्या वस्तू घेऊन सर्व वस्तूंमध्ये सर्वात जड वस्तू कोणती व सर्वात हलकी कोणती याचे नाव सांगायला सांगा.




वर्कशीट ७ – पाहुणा ओळख.

आयडिया कार्ड ८
मराठी

# पालक समूहासाठी

महाराष्ट्र शासन | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

## स्वागत आणि सुरुवात



- एकमेकांची खुशाली विचारू आणि आजची मीटिंग सुरू करू.
- मागील आठवड्यातील 'जड व हलक्या वस्तू ओळखणे' ही कृती मुलांना सोपी वाटली का? मुलांनी कोणकोणत्या वस्तू घेतल्या? कोणती वस्तू सर्वांत लहान व कोणती वस्तू सर्वांत मोठी सापडली?
- 'One,Two Buckle My Shoe' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?




आपल्या आसपास कितीतरी रंग आपल्याला दिसतात. आपले जीवन रंगांशिवाय अपूर्ण आहे. मुलांना या रंगांची ओळख आपण आसपासच्या वस्तूंद्वारे सहज करवू शकतो.

चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण काय करू शकतो.

येथून डाउनलोड करा

S3K9R1

https://bit.ly/3BNQasE


## मिळून काही करू

शब्दांच्या चिठ्ठ्या बनवून पिशवीत ठेवू या. डोळे बंद करून त्यातील ४–५ चिठ्ठ्या उचलू या. जे शब्द येतील त्या शब्दांच्या मदतीने मुलांसाठी छानशी गोष्ट बनवू या. ज्या पालकांना गोष्ट बनविण्यात अडचणी येत असतील, त्यांना मदत करू या.

| घर | चिमणी | कार |
|---|---|---|

एक दिवस राजूच्या स्वप्नात चिमणी आली. चिमणी कार चालवत होती. तिने राजूला गिफ्ट दिले व घरी यायचे आमंत्रण दिले.

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या



चित्रात दाखविल्यानुसार कागदाचे मगरीचे तोंड बनवा. मुलांना कमी–जास्त संकल्पना समजून घेण्यासाठी याचा उपयोग करा. जसे–जास्त वस्तूंकडे मगरीचे उघडलेले तोंड असते.
हा खेळ वस्तूंसोबत, वस्तू व अंकांसोबत तसेच अंकांसोबत खेळा.

वर्कशीट ८ – आकारांची जोडी लावा.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड ९
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारू आणि आजची मीटिंग सुरू करू.
- मागील आठवड्यातील 'कमी–जास्त वस्तू/संख्यांमध्ये तुलना करणे' ही कृती मुलांनी कशाप्रकारे केली याचे अनुभव सांगा.
- 'घरापुढे थांबला टांगा ...' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.



(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

पाहुणा ओळखा ही कृती घरगुती वस्तूंचा वापर करून सहज करता येते. जसे– 3 कांदे व 1 बटाटा मुलांसमोर ठेवून यात वेगळे कोण आहे हे विचारा. यात घरातील विविध वस्तूंचा वापर आपण करू शकतो. ही कृती चित्र कार्डांच्या मदतीने आपण कशी घेऊ शकतो हे या व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या.



येथून डाउनलोड करा

P6I4U8

https://bit.ly/3vm6uj1

## मिळून काही करू

चला, शब्दांच्या भेंड्या खेळू या. खेळ सुरू करण्यासाठी एक पालक कोणताही एक शब्द म्हणतील. त्या शब्दाचे शेवटचे अक्षर घेऊन पुढील पालक दुसरा शब्द म्हणतील.
जसे– शाल.... लबाड...डमरू

शाल
लबाड
डमरू

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

मुलांना घरातील उपलब्ध चित्र दाखवा व चित्रांच्या मदतीने गोष्ट सांगण्यास मदत करा. गोष्टीला छानसे नाव द्या. गोष्ट सांगतानाचा मुलांचा व्हिडिओ आम्हांला पाठवा.



वर्कशीट ९ – नमुना बघून लिहा.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड १०
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात




- एकमेकांची खुशाली विचारू आणि आजची मीटिंग सुरू करू.
- मागील आठवड्यातील 'अंकपट्टीवर उडी मारणे' ही कृती मुलांनी कशी केली याबद्दलचे अनुभव पालक सांगतील.
- 'साफसफाई करा' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?

मुलांना सोप्या पद्धतीने तसेच खेळाद्वारे मोजणे ही क्रिया समजावल्यास त्यांना पटकन समजते. हे आपण घरातील कामे करता-करता सहज करू शकतो. जसे- जेवताना ताटात मोजून चपात्या वाढाव्या, धुतलेले कपडे मोजावे इ. चला, व्हिडिओच्या मदतीने आपल्याला कशा प्रकारे काम करायचे आहे हे समजून घेऊ या.




स्कॅन करा डाउनलोड करा

https://bit.ly/3HiosVZ

## मिळून काही करू

चला, आपण गेल्या दोन दिवसात काय जेवलो यावर बोलू या. तुमची मुले बाहेरील अरबट-चरबट खाणे खातात. त्या खाण्यातून त्यांना पोषक घटक मिळतात? दाखविलेल्या चित्रावरून आपण समजून घेऊ या, की कोणते पदार्थ किती प्रमाणात खाल्ल्यास आपल्याला पोषण मिळते.



## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या

वस्तूंची लांबी कशी मोजावी हे सांगण्यासाठी आपण घरातील वस्तू घेऊन (जसे- टेबल, टीव्ही, कपाट, ग्लास इ.) हाताच्या मदतीने कसे मोजतो हे दाखवा. म्हणजे एक वीत. अशाप्रकारे प्रत्येक वस्तू किती वीत आहे हे मुलांना मोजायला सांगा. गरज पडल्यास त्यांना मदत करा.



वर्कशीट १० - चित्रे व अक्षरे यांच्या जोड्या लावा.

चाचणी प्रत

आयडिया कार्ड ११
मराठी

# पालक समूहासाठी

महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## स्वागत आणि सुरुवात




- एकमेकांची खुशाली विचारू आणि आजची मीटिंग सुरू करू.
- मागील आठवड्यातील 'चित्र पाहून गोष्ट सांगा' ही कृती मुलांनी कशाप्रकारे केली याचे अनुभव सांगा.
- हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?




कार्ड 10 'घरातील वस्तूंसह मोजणे' ही कृती झाल्यावर व्हिडिओच्या मदतीने आपण अंक ओळख कशी करू शकतो हे समजून घेऊ या. अंक कार्ड व वस्तूंची सांगड घालून दाखवू या. जसे– 1– , 2– , 3– चला या अगोदर व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या, की आपण अंक ओळख कशी करू शकतो.

पाहून डाउनलोड करा

J1P4A2

https://bit.ly/3vjootw

## मिळून काही करू



चला, एक गमतीशीर खेळ खेळू या. दोन–दोन पालकांचे गट बनवू या. सोबत कागद व पेन घेऊ या. पहिले पालक डोळ्यांवर पट्टी बांधून कागदावर गोल, त्रिकोण व चौकोन आकार काढण्याचा प्रयत्न करतील. तर दुसरे पालक आकार काढण्यासाठी त्यांना सूचना देतील.

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू यां



जमिनीवर एक रेषा काढा. चित्रात दाखविल्याप्रमाणे ० ते १० पर्यंतचे अंक त्यावर लिहा. मुलांना एका अंकावर उभे राहण्यास सांगा. उदाहरणार्थ ०. आता त्यांना दुसऱ्या अंकावर उडी मारण्यास सांगा. जसे, ० वरून १ मग २ व मग ३ वर उडी मारण्यास सांगा. मुलांना प्रश्न विचारा तुम्ही ३ वरून किती वेळा उडी मारून ६ पर्यंत पोहोचाल? हा खेळ वेगवेगळे अंक घेऊन खेळा.

**वर्कशीट ११ – शरीराचे अवयव व त्यांची नावे यांच्या जोड्या लावा.**

चाचणी प्रत

आयडिया कार्ड १२
मराठी

# पालक समूहासाठी

## स्वागत आणि सुरुवात



- एकमेकांची खुशाली विचारू आणि आजची मीटिंग सुरू करू.
- मागील आठवड्याची 'वस्तू हाताने मोजणे' कृती करताना मुलांनी कोणकोणत्या वस्तू मोजल्या?, त्यांना मजा आली का? यावर चर्चा करा.
- 'शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा' हे बालगीत ऑनलाईन शोधू, पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.

(सूचना : या घटकावर आधारित दीक्षावरील योग्य व्हिडिओचा वापर करावा.)

## पाहू आणि गप्पागोष्टी करू?



तुम्ही लहानपणी गोष्टी ऐकल्यात का? गोष्टी ऐकण्याचे खूप फायदे आहेत. जसे – मुलं एका जागेवर बसायला शिकतात, विविध कल्पना करू लागतात, नवीन शब्दांची ओळख होते आणि समस्या सोडविण्याचे, विचार करून बोलण्याचे कौशल्य वाढते. यासाठी तुम्ही मुलांना रोज एक गोष्ट सांगाल का? चला, या व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊ या.

येथून डाउनलोड करा

L8X7Y5

https://bit.ly/3JYunkX

## मिळून काही करू



चला, सर्व गोलाकार बसू. घरून आणलेली झाडांची पाने गोलात गोळा करू.
एक-एक पान उचलून त्यात कोणती आकृती दिसते याचा विचार करू.
कल्पनेचा वापर करून काही नवीन बनविण्याचा प्रयत्न करू. तसेच इतर पालकांना मदत करू.

## घरी जाऊन मुलांसोबत कृती करू या



कोणतीही मुलांच्या आवडीची गोष्ट मुलांना हावभावासहित सांगा.
मुलांना गोष्टीवर आधारित प्रश्न विचारा. मुलांना कल्पनेच्या दुनियेत भरारी मारू द्या.

**विशेष सूचना :** गेले काही आठवडे आपण मुलांची शाळेची तयारी करीत आहोत. पुढील सुट्टीतही खंड पडणार नाही याची काळजी घेऊ. जूनमध्ये शाळा सुरू होईपर्यंत असेच भेटत राहू व हसत-खेळत मुलांची शाळेची तयारी करू.

वर्कशीट १२ – दिलेल्या सूचनेनुसार चित्रांवर गोल करा.